सोलापूर महानगरपालिका

निविदा सूचना

मा.महाराष्ट्र शासन २०११ चा अद्यादेश क्र.१२ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि.२१ मे २०२१ सोलापूर महानगरपालिका, सोलापूर घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता खालील कामाकरीता दोन लिफाफा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | कामाचे वर्णन | टेंडर र.रु. | बयाणा र.रु. | सुरक्षित र.रु. | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सॅनिटेशन वार्डाकरीता जंतुनाशक कार्बोलिक पावडर (५%) खरेदी करणे<br>खरेदीची मर्यादा २० टन | ९,९५,०००/- | १०,०००/- | २०,०००/- | २५००/- | वर्क ऑर्डर दिल्यापासून ७ दिवस |

टिप : पुरवठाधारक यांनी उपरोक्त कार्बोलिक पावडरचे दर प्रतिकिलोचे द्यावयाचे आहेत.

शर्ती व अटी :

१) दरपत्रके दि . 17 / 11 /२०२३ ते दि.24/ 11 /२०२३ पर्यंत दुपारी 1:00 वाजेपर्यंत मुख्य लेखापाल कार्यालय मनपा येथे सदर करावयाचे आहे .

२) बयाना र.रु.१०,००० /- दि. 17 / 11 /२०२३ ते दि. 23 / 11 /२०२३ अखेर दु. 1.00 वाजेपर्यंत मुख्य लेखापाल कार्यालयत मनपा येथे रोखीने भरावयाचे आहे .

३) २ % सुरक्षित रक्कम वर्क ऑर्डरच्या वेळी करार पत्र करतेवेळी मनपा कोषाग्रहात भरावयाची आहे.

४) दरपत्रक लेटर पॅडवर नमूद करून बंद पाकिटात सदर करावयाचे आहेत . बंद पाकीट क्र . १ तांत्रिक लिफाफा खालील आवश्यक कागदपत्रे बंद पाकीट क्र . २ वित्तीय लिफाफा.

५) दयावयाचे दर हे सर्व शासकीय करासहित द्यावयाचे आहेत .

| लिफाफा क्र.तांत्रिक लिफाफा | लिफाफा क्र.२ दरपत्रक लिफाफा |
|---|---|
| १) pancard<br>२) शॉपअॅक्ट लायसन<br>३) अशाप्रकारच्या पुरवठा दिलेल्या साहित्याच्या वर्कऑर्डरची प्रत<br>४) जंतुनाशके विक्रीचा शासकीय परवाना | संथेचा लेटर पॅडवर सही शिक्क्यानिशी दरपत्रक देणेत यावे |

उपायुक्त - १

घनकचरा व्यवस्थापन विभाग

## DISCLAIMER

१) सदर निविदेबाबत असलेल्या प्रक्रियेच्या तारखा टेंडरदारांनी स्वत: तपासून घ्यावयाचे आहे. या तारखाप्रमाणे वेळोवेळी प्रक्रिया करावयाची संपूर्ण जबाबदारी टेंडरदाराची आहे.

२) सदर निविदेबाबत ज्या तारखा सो.म.पा. घनकचरा व्यवस्थापन ने जाहिर केलेल्या आहेत व जी प्रक्रिया अवलंबलेली आहे त्याप्रमाणे म.न.पा. संकेतस्थळावर निविदा ~~ई-टेंडरिंगची~~ कार्यप्रणाली कार्यान्वित ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित वेब–साईटची आहे.

३) सदर निविदेबाबत वेबसाईटची सेवा पुरविण्याकडून काही अडचणी निर्माण झाल्यास व यामुळे टेंडरदारांना निविदा भरणेस अडचणी निर्माण झाल्यास सो.म.पा. घनकचरा व्यवस्थापन यास जबाबदार असणार नाही.

४) सदर निविदेबाबतची संपूर्ण माहिती दिलेल्या मुदतीत आगाउ स्वरुपात मिळवून त्याप्रमाणे कार्यवाही ठेवण्याची जबाबदारी टेंडरदारांची आहे. याबाबत सो.म.पा. घनकचरा व्यवस्थापन जबाबदार असणार नाही.

५) म.न.पा संकेतस्थळावरील ~~ई~~ निविदा प्रक्रियेमध्ये काही तांत्रिक अडचणी अथवा संकेतस्थळाच्या पुरविणेत येणा–या सेवेमध्ये अडचणी निर्माण झाल्यास याबाबत टेंडरदारांना अडचणी आल्यास टेंडरदारांना सो.म.पा. घनकचरा व्यवस्थापनाकडे कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच याबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

उपायुक्त
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

## सो.म.पा.घनकचरा व्यवस्थापन कर्मचा-याकरिता साहित्य खरेदी करणे

## निविदा दरपत्रके अटी व शर्ती

१) टेंडर भरणा-या मक्तेदाराच्या फर्मचे भागीदार (एक अगर अनेक) असतील तर सर्व भागीदारांच्या सह्या, टेंडरफॉर्म करारपत्र वगैरे प्रकारच्या आवश्यक असलेल्या कागदपत्रावर होणे जरुरीचे आहे. भागीदार त्यावेळी नसेल तर भागीदाराचे जरूर ते अधिकारपत्र टेंडरच्या आवश्यक त्याकागदपत्रावर सही करणा-यांच्या नांवे असणे जरुरीचे आहे. टेंडर फर्मच्या नावे करावयाचे असले तर सही करण्याचा अधिकार कोणास दिलेला आहे याबाबत कायदेशीर अधिकारपत्राची खरी नक्कल टेंडरसोबत जोडणे जरुरीचे आहे.

२) टेंडर भरण्यापूर्वी टेंडर बाबतीतील सर्व प्रकारचे नियम, अटी स्पेसिफिकेशन्स व इत्यादीचा पूर्ण अभ्यास करून टेंडर भरावे. त्यानुसार सर्व प्रकारचे नियम, अटी व स्पेसिफिकेशन मान्य असल्याबाबतची सही करावी. टेंडर उघडल्यानंतर कोणत्याही बाबतीतील तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

३) टेंडरसोबत मागितलेली सर्व कागदपत्रे टेंडरमान्य म्हणून सही केलेल्या स्पेसिफिकेशन बयाणा रकमेची पावती वगैरे कागदपत्रे सोबत असणे अनिवार्य आहे.

४) कोणतेही टेंडर कारण न देता मंजूर वा ना मंजूर करणेचे अधिकार मा.आयुक्त सो.म.पा. यांना राहील त्याची कारणे देण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर राहील.

५) पुरवठा मुदतीत पूर्ण न झाल्यास सुरक्षित रक्कम व बयाणा रक्कम जप्त केले जाईल.

६) मक्तेदाराच्या योग्ययोग्यतेबाबत शंका आल्यास त्याने आतापर्यंत केलेल्या कामाशी/पुरवठ्याशी संबंधित प्रमाणपत्रे मागविण्याचा अधिकार मा.उपायुक्त यांना आहेत.

७) मक्तेदाराने पुरवठा केलेला माल समाधानकारक नसल्यास त्याप्रमाणे मक्तेदारास कळवून इतर कोणत्याही म्क्तेदाराक्डून पुरवठा करून घेण्यात येईल व त्या व्यवहारामध्ये जर महापालिकेचे नुकसान झाल्यास असे नुकसान मूळ मक्तेदाराकडून वसूल करून घेण्यात येईल.

८) मक्तेदाराने पुरवठा करण्यात येणा-या कार्बोलिक पावडरचे सॅम्पल (किमान १ किलो) आणून ते अप्रूव्ह करून घ्यावे व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे अप्रुव्हल लेटर असल्याशिवाय निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

(५)

९) कामगाराबाबतचे सर्व कायदे मक्तेदारास लागू असून त्याची सर्व जबाबदारी मक्तेदारावर राहील.

१०) मा.केंद्रशासन व राज्य शासन यांचेकडील सर्व आवश्यक करविषयक कायदे मक्तेदारास लागु राहतील.

११) काही नैसर्गिक आपत्तीमुळे मक्तेदाराचे अथववा कामाचे नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मक्तेदार यांची स्वत:ची राहील.

१२)पुरवठा करते वेळी एखादया कामगारास दुखापत झाली अगर मृत्यू आला तर त्यासंबधीचं कोणत्याही नुकसान भरपाईची जबाबदारी पूर्णपणे मक्तेदार यांची राहील.

१३) टेंडर शर्ती व अटी संबंधात भविष्यात वाद निर्माण झाल्यास मा.आयुक्त सो.म.पा निर्णय देतील तो टेंडरदारावर बंधनकारक राहील.

१४) सदर कामाबददल काही वाद निर्माण झाल्यास तो सोलापूर न्यायकक्षेच्या हददीत राहील.

१५) मक्तेदाराने दयावयाचे दर हे सर्व शासकिय करासह असणे आवश्यक आहे.

उपायुक्त
सोलापूर महानगरपालिका